# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २३/१२/२०२४

अपहरण करणे :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे राजापेठ . अप क्र ७४६/२४ कलम १४०(१), ३०९ (४),१८९(२ ),१८९ (४),१९०,३ ५१(३), २९६ बी.एन एस. एस. ४/२५ आर्म अक्ट | अमरावती | ‘घि ता वेळ दि. २२/१२/२०२४ चे ११/००वा ते ११/३० वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ  दि. २३/१२/२४ चे ०४/३०वा | एक महिला | भूपेद्र उर्फ बोपी ठाकूर वय ४४ वर्ष रा बालाजी प्लॉट अमरावती २) मयुर अनील गुजर वय २८ वर्ष रा भुतेश्वर चौक अटक दिनांक २३.१२.२४ चे ०५.१२<br><br>७ इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की मागील चार ते पाच महिण्याआगोदर माझा मुलगा हा रविनगर मधील जीममध्ये जात होता माझा मुलगा व बोपी ठाकूर याचा पुतन्या यांच्यामध्ये वाद झाला होता. त्यानंतर ते आम्ही आपसी केली होती, माझ्या मुलगा आम्ही माफी मागीतली होती,तो विषय संपला होता. काल  दि. २२/१२/२४ रोजी रात्री ११/०० वा दरम्यान मी घरी असताना सहा ते सात लोक चारचाकी स्कार्पीओने घरी आले, खाली एक आजी भाडयाने राहते तीचा दरवाजा ते लोक जोराने ठोकत होते, मी माझ्या बेडरुम मधून बघीतले वरून मी खाली आली व त्या लोकांना विचार पूस केली असता त्यापैकी एक ईसम जो पार्याने वर आला व मला म्हणू लागला मी बोपी ठाकूर आहे तुमच्या मुलाला आवाज दया वरुन मी काय झाले म्हणून त्यानी मला विचारले असता ,बोपी ठाकूर यांनी म्हटले की तुमच्या मुलाची एवढी हीम्मत की माझ्या पुतण्याशी वाद विवाद केला ना बघा त्याचा तुकडा पण मी दिसु देणार नाही म्हटले असता तेवढयात माझा मुलगा तेथे आला तेवढयात बाकी मुलानी त्याला गाडीत जबरदस्तीने घातले म्हणुन मी मुलाला बाहेर काढण्याकरीता त्याचा हात पकडला व त्याला ओढले वरुन माझा मुलगा तेथुन पळुन गेला,माझ्या मुलाचा त्यांनी जबरदस्तीने हिसकावुन घेतला व गोपी ठाकुर याने मला म्हटले,की तु त्याची आई आहे का तुला सोडनार नाही व तुझ्या मुलाचे तुकडे करुन टाकनार असे मला बोपी ठाकूर याने म्हटले व त्याचेसोबत असलेले सहा जण माझ्या मूलाच्या पाठीमागे लागले ,त्यापैकी एका मुलाने त्याचे कमरेत असलेला चाकु काढला व एकाने लाकडी दांडु माझ्या मुलाचा पाठलाग करु लागले,तसेच त्यानी माझ्या मुलाचा मोबाईल हिसकावल्याने माझा मुलगा कुठे आहे त्याबाबत माहीती नाही, भूपेद्र उर्फ बोपी ठाकूर त्याचेसोबत असलेले सहा ते सात जणानी मला अश्लिल शिवीगाळ करून जीवाने मारण्याची धमकी दिली गुन्हा दाखल |

➢ दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती शगर अपक्र. १०८४/२४ कलम- ११८(१), ३५२,३५१(१),३(५) बीएनएस | सिध्दार्थ नगर अमरावती | दि.२२.१२.२०२४ चे १७.०० वा ते १७.३० वा<br><br>दि. २३.१२.२०२४ चे ०१.२० वा | नंदकुमार भाउराव चक्रे वय- ३० रा. सिध्दार्थ नगर अमरावती | १ एक महिला<br>२.चंदुभाउराव चक्रे रा. सिध्दार्थ नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकानी यातील फिर्यादी हे त्याच्या भाउ आरोपी क्र.२ याच्या घरी वरच्या मजल्यावर राहतो फिार्यादी हे कामा वरुन घरी आले असता आरोपी क्र.१ हिने महिला नातेवाईकासोबत प्रेमसंबध असल्याच्या कारणावरुन वाद घातला व आरोपी क्र.२ हयाने फिर्यादीस शिवीगाळ करुन हात धरुन ठेलवे व आरोपी क्र.१ हिने फिर्यादीस डोक्यावर कैची मारली व दोन्ही हातावर ओरबडले व नमुद दोन्ही आरोपी ने फिर्यादी शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली .अशा फिर्यादी च्या जबानी रिपोर्ट वरुन व मेडीकल सर्टिफिकेटवरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | चोरी गेला माल/ मिळाला माल | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पोलीस स्टेशन गाडगेनगर अपक्र.१०८५/२०२४ | अमरावती | दि.२१.१२.२०२४ चे १६.०० वा<br><br>दि. | एक महिला | अज्ञात | १,५२,०००/-रु चा माल | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व टिकानी यातील फिर्यादी हे लग्नी करीता गेले असता नमुद वेळी घरी आल्यावर त्यानी पाहले की, घराच्या मागील बाजुस किचन रुमला लावलेले कुलुप तुटलेदिसले . आत मध्ये प्रवेश केला असता बेडरुमचे सामान अस्ताव्यस्त होते. व कपाटा मध्ये टेवलेले १.एक सोन्याचे मंदळसुत्र ११ ग्रॅम क्.अ. ५५,०००/- रु |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कलम- ३०५(१) ३३१(३), ३३१(४)बीएनएस | | २३.१२.२०२४ चे १४.५५ वा | | | | १. एक चार ग्रॅंम ०३ कि.अ.१७,०००/-रु<br>२. एक जोड कानातले २ ग्रॅंम कि.अ.१०,०००/-रु<br>३. एक जोड कानातले ४ ग्रॅंम कि.अ. २०,०००/-रु<br>४. एक २०मण्याची पोत त्यामध्ये २०ग्रॅंम पेडाल एकुन ६ ग्रॅंम वजनाचे कि.अ. ३५,०००/-रु<br>५. रोख रक्कम १५,०००/-रु असा संपुरर्ण १,५२,०००/-रु चा माल अज्ञात चोराने लॉंक तोडुन घरात प्रवेश करुन चोरुन नेला .अशा फिर्यादी च्या जबानी रिपोर्ट् वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | पो स्टे राजापेठ अप क्र ७४७/२४ कलम ३०५(अ),३३१(४) भा न्या स | घटनास्थळ नवाथे प्लॉट ,बडनेरा रोड,ॲथर शोरुमच्या खाली असलेल्या पंतजली मेगा स्टोर मध्ये | ‘ घि ता वेळ दि. २३/१२/२०२४ चे पहाटे ०३/३९ ते ०३/४७वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ दि. २३/१२/२४ चे ११/३७वा स्टेडा नोंद क्र. | फिर्यादी नांव श्री राजेश शंकरराव मरसकोल्हे वय ४९ वर्ष ,व्यसाय पंतजली मेगा स्टोर येथे व्यवस्थापक रा.कल्याण नगर गल्ली नं११ अमरावती | आरोपीचे नाव अंदाजे २५ ते ३० वयोगटाचा मुलगा अंगात राखळी रंगाची हुडी थंडीचा जॉकेट घातलेला व काळया रंगाचा जीन्स तोडला काळा निळा पाढरा पटटे असलेला रुमाल व पायात पांढरे काळे पटटे असलेले स्पोर्ट शुज असलेला अनोळखी इसम | एकूण ६०,०००/-रु. | हकीकत अशा प्रकारे आहे की सदर स्टोर आम्ही दररोज सकाळी १०.०० वाजता उघडतो व रात्री १०.०० वाजता बंद करतो .आमच्या स्टोर मध्ये सिंण्ध्दात धवते,रोहन राउत व एक मुलगी हे काम करीत आहे स्टोरची देखरेख करण्याकरीता रात्री ०८.०० ते सकाळी ०८.०० वाजे पर्यंत सुदेश गुप्ता वय ६३ वर्ष यांना चौकीदारी करीता ठेवले आहे. आज दि. २३/१२/२४ रोजी सकाळी ०७.४२ वाजता मला चौकीदार श्री सुदेश गुप्ता यांचा त्यांचे मो. क्रंमाकावरुन फोन आला व त्यांनी सांगितले की मी फ्रेश होण्याकरीता गेलो होतो व परत आलो असता त्यादरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने दुकानाचे लॉक व काचव फोडले असल्याचे सांगितले तेव्हा मी माझे सहकारी आशिष अंबुलकर यांना फोन करुन दूकानात चोरी झाली असल्याचे सांगितले असता ते मला घेण्याकरीता माझ्या झरी आले व त्यानंतर आम्ही दोघानी दुकानात पोहचुन दुकानाची पाहणी केली असता दुकाणात दोन्ही लॉक व शटर तसेच स्टोरचा टफन ग्लास तोडला असल्याचे दिसले व बाजुला ३ फुटाचे दोन रॉड पडले होते.त्यानंतर आम्ही दूकानाच्या आत जावुन पाहनी करुन उुकानाचे ` ` ` कॅश काउन्टर चेक केले असता शनिवारी व रविवारी रोजच्या विक्रीव्दारे जमा केलेले असू एकूण ६०,०००/-रु. बॅक बंद असल्यामूळे कॅश कॉउन्टर मध्ये ठेवलेली रक्कम दिसून आली नाही त्यानंतर आम्ही स्टोर मध्ये असलेले सीसीटीव्ही चेक केले असता पहाटे ०३.३९ वाजता दरम्यान अंदाजे अंदाजे २५ ते ३० वयोगटाचा मुलगा अंगात राखळी रंगाची हुडी थंडीचा जॉकेट घातलेला व काळया रंगाचा जीन्स तोडला काळा निळा पाढरा पटटे असलेला रुमाल व पायात पांढरे काळे पटटे असलेले स्पोर्ट शुज असलेला<br>वर नमुद अनोळखी चोराने आमच्या दुकानातुन एकुण ६०,०००/- रु सदर सीसीटीव्ही फुटेज मी माझ्या स्तवता मोबाईल मध्ये घेतले असून तो पुढील कार्यवाही करीता पो.स्टे ला पेन ड्राईव्ह मध्ये आणुन देणार आहे गुन्हा दाखल |